प्रकरण १

# प्रस्तावना

## प्रकरण १

# प्रस्तावना

कालिदास हा विश्ववंद्य कवी आहे. त्याच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. तसेच त्याच्या कालासंबंधीही मतमतांतरे आहेत. इ.स. पूर्व १५० ते इ.स. ६०० पर्यंतच्या कालावधीमध्ये कालिदास कधीतरी होऊन गेला असावा. (त्रिपाठी राधावल्लभ, १९९७, पृ. २७)

नाटक प्रयोगप्रधान करणारा आणि काव्यात नाट्यमय प्रसंग गुंफणारा कालिदास संस्कृत काव्यातील अग्रगण्य कवी मानला जातो. त्याचे साहित्य म्हणजे अव्वल दर्जाच्या कलाकृती आहेत. त्याच्या समृद्ध वाङ्मयाची गणना राष्ट्रीय सम्पत्तीत केली तर वावगे होणार नाही.

## कालिदासाचे वाङ्मय

कालिदासाच्या कलाकृतीने देशकालाच्या सीमा ओलांडल्या आहेत. कालिदासाच्या वेळेपर्यंत भारतीय चिंतन परिपक्व आणि विकसित झाले होते. षड्दर्शने तसेच अवैदिक दर्शनातील मतमतान्तरे आणि सिद्धान्त परिणीत रूपात, बदललेल्या रूपात समोर आले होते. दुसरीकडे आख्याने, उपाख्याने आणि पौराणिक वाङ्मयाचा लोकांत चांगलाच प्रचार झाला होता. वैदिक धर्म आणि दर्शने कालिदासाच्या काळात पुन्हा रुजली होती. ज्योतिष, गणित, आयुर्वेद या विद्या शाखांचाही विकास कालिदासाच्या काळात झाला होता. याचा परिपाक कालिदासाच्या वाङ्मयामध्ये दिसून येतो.

कालिदासाच्या सात कलाकृती विश्वसाहित्यात सन्मानित आहेत. यातील तीन रूपके (नाटके) आहेत. १) अभिज्ञानशाकुन्तल, २) विक्रमोर्वशीय, ३) मालविकाग्निमित्र. ऋतुसंहार आणि मेघदूत ही दोन लघुकाव्ये आणि कुमारसंभव आणि रघुवंश ही दोन महाकाव्ये आहेत.

**१) ऋतुसंहार** – संपूर्ण संस्कृत साहित्यात ऋतुसंहार हे एकच स्वतंत्र ऋतुकाव्य आहे. यात भारतातील सर्व सहाही ऋतूंचे स्वतंत्र रूपाने आणि क्रमश: वर्णन आलेले आहे. ही कालिदासाची पहिलीच रचना असावी. समीक्षकांच्या मते कालिदासाने हे काव्य त्याच्या युवा अवस्थेत लिहिले असावे. (त्रिपाठी राधावल्लभ, १९९७, पृ.२५)

ऋतुसंहारामध्ये कविकल्पनेचा मनोहर आविष्कार वाचकाला आकर्षित करतो. प्रत्येक ऋतूचे वर्णन वाचताना आपण त्यात एवढे ओढले जातो की आपण त्या त्या ऋतूचा अनुभव घेत आहोत असे वाटते. हे काव्य लिहिताना कवी विन्ध्य पर्वताच्या आसपास वास्तव्यास असावा. कारण ज्या पशु-पक्ष्यांचे, वनस्पतींचे वर्णन त्यात आहे ते विन्ध्य परिसरातील आहे. ग्रीष्मातील भयावह विन्ध्य वर्णन आणि वर्षा ऋतूतील मनोज्ञ परिसराने तो आकर्षित होतो. 'वनानि वैन्ध्यानि हरन्ति मानसम्' (२.८) हा श्लोक त्याची ग्वाही देतो.

ऋतुसंहार कालिदासाच्या काव्ययात्रेचा पहिला टप्पा आहे. या ऋतुंबरोबरच कामुक लोकांच्या विलासी जीवनाचेही वर्णन केले आहे. यात निसर्ग सौंदर्याचे वर्णन गौण आहे, शृंगारिक वर्णन प्रधान आहे. प्रत्येक सर्गात त्याने आपल्या प्रियेला संबोधले आहे. ऋतुचे वर्णन करताना स्त्री-पुरुष जीवनावर त्या ऋतुचा

काय प्रभाव पडतो याचेही वर्णन कवीने केले आहे. सहावा सर्ग सर्वात मोठा आहे. यात कालिदासाने निसर्गाचे अधिक सुन्दर चित्रण केले आहे. बहुतांश वर्णन वसंत ऋतुमुळे प्रभावित झालेल्या मानवी मनाचे आहे. वसंताचे वर्णन जास्त कामोद्दीपक स्वरूपाचे आहे. उदा. 'द्रुमा: सपुष्पा: सलिलं सपद्मं स्त्रिय: सकामा पवन: सुगन्धि: । सुखा: प्रदोषा दिवसाश्च रम्या: सर्वं प्रिये चारुतरं वसन्ते ।

ऋतुसंहार एका महान कवीच्या प्रथम स्पंदनाची एक श्रेष्ठ आणि सरस अभिव्यक्ती आहे. कल्पनेची कमनीयता, भाषेची प्रौढी आणि सरसता यामुळे ही कलाकृती महत्त्वपूर्ण आहे. संपन्न कवीचे सुंदर किशोर रूप ऋतुसंहारामध्ये पहावयास मिळते. टीकाकार मणिराम (त्रिपाठी राधावल्लभ, १९९७, पृ.२७) यांच्या मते मात्र या काव्याची उपेक्षा झाली आहे.

**२) मेघदूत** – ही कालिदासाची अप्रतिम रचना आहे. ही एकच कलाकृती कालिदासाला 'कविकुलगुरू' ही उपाधी मिळवून देण्यास समर्थ आहे. भाषा, भावप्रवणता, रस आणि छंद या सर्वच दृष्टीने मेघदूत अनुपम खण्डकाव्य आहे. सहृदय रसिकांनी या काव्याची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. समीक्षकांनी केवळ संस्कृत जगतातच नव्हे तर विश्वसाहित्यात याला श्रेष्ठ काव्याचे स्थान दिले आहे. (त्रिपाठी राधावल्लभ, १९९७, पृ.३२) मेघदूत प्रणयकातर व्यक्तीची अभिव्यक्ती आहे. मेघदूताचे पूर्वमेघ आणि उत्तरमेघ असे दोन भाग आहेत.

अलका नगरीचा अधिपती धनराज कुबेर आपला सेवक यक्ष कर्तव्यच्युत झाल्याबद्दल त्याला नगरातून हद्दपारीची शिक्षा सुनावतो. त्यामुळे तो यक्ष अलका नगरीपासून दूर असणाऱ्या रामगिरी पर्वतावर आश्रयासाठी जातो. कसेतरी आठ महिने काढतो. परंतु आषाढ महिन्यात पहिल्याच दिवशी रामगिरीवर तो एक मेघखण्ड पहातो आणि आपल्या आपल्या प्रियेच्या आठवणीने व्याकूळ होतो आणि हा मेघ अलका नगरीत पोहोचेल. तेव्हा आपल्या प्रियेची काय अवस्था होईल या विचाराने तो व्याकुळ होतो. त्याच वेळी त्याला एक हृदयंगम कल्पना सुचते. या मेघाबरोबरच आपण आपल्या प्रियेला आपली खुशाली कळवावी असा तो विचार करतो. त्यासाठी रामगिरीपासून अलकानगरीपर्यंतचा मार्ग त्याला वर्णन करून सांगतो. मार्गातील पर्वत, नद्या, गावे, नगरे ज्याच्यावर त्याला जलवर्षाव करावयाचा आहे त्याचे वर्णन यक्ष करतो. उज्जयिनी, विदिशा, दशपूर इत्यादी नगरे, ब्रह्मावर्तादि तीर्थे, वेत्रवती, गम्भीरा आदि नद्या पार करून मेघ हिमालय आणि त्यावर वसलेल्या अलका नगरीत पोहोचला आहे अशी कल्पना पूर्वमेघात येते. उत्तरमेघात अलकानगरी, यक्षाचे घर, त्याची प्रिया आणि प्रियेसाठी यक्षाचा संदेश हा काव्याचा विषय आहे.

मेघदूत विप्रलम्भ शृंगाराचे संस्कृत साहित्यातील सर्वोत्कृष्ट काव्य मानले जाते. विरहवेदनेची तीव्रता, प्रेमाची अनन्यता तसेच भावैकतानता यांचे असे अनोखे चित्रण आणि तेही गंभीर जीवनदृष्टी आणि सांस्कृतिक मूल्यबोध यासह अन्य कोठेही मिळत नाही. कवीने आपल्या काव्यात त्या यक्षाच्या मन:स्थितीचे वर्णन केले आहे. यक्षाने आठ महिने आपल्या प्रियेच्या विरहात काढले आहेत. परंतु मीलनाचा समय जसाजसा जवळ येत आहे तशी तशी त्याला प्रियेची जास्त चिंता वाटत आहे आणि तिला भेटण्याची आतुरता वाढते आहे. उत्कट जिजीविषा, भावसांद्रता आणि मनाच्या कल्पकतेची रम्यता यांचा अजोड मिलाफ मेघदूतात अनुभवाला येतो. हृदयाची सुकुमारता आणि उत्कट प्रेम याचा बोध मेघदूतातून होतो. अशा प्रकारे मेघदूतातील रससृष्टीने आणि कालिदासाच्या कविप्रतिभेने मोठ्या कुशलतेने मेघदूतात मनोविज्ञान गोवले आहे. यात सुरुवातीपासून शेवटपर्यंत मंदाक्रान्ता वृत्त आहे. या छंदाच्या विशिष्ट लयीमुळे

समग्रकाव्य वेदना, उच्छवास-नि:श्वास, तथा मेघाच्या द्रुतविलम्बित गतीचा अनुभव देते. वस्तुत: कालिदासाने या छंदाचा इतका वापर केला आहे की पावसाळा, प्रवास आणि संकट या वर्णनासाठी मंदाक्रांता छंद विशेष उपयुक्त आहे असा नियमच तयार झाला. ''प्रावृट् प्रवास व्यसने मन्दाक्रान्ता विराजते ।''

मेघदूत छंद आणि भाषाशैलीच्या दृष्टीने संस्कृत साहित्यातील अनुपम ठेवा आहे.

**३) कुमारसंभव –** हे सतरा सर्गाचे महाकाव्य आहे. यापैकी आठ सर्गापर्यंतची रचनाच कालिदासाने केली असावी असे मानले जाते. उर्वरित नऊ सर्ग कोणीतरी लिहून त्यात नंतर समाविष्ट केले असे मानले जाते. वल्लभदेव, मल्लिनाथ आदि प्राचीन टीकाकारांनी आठ सर्गावरच टीका लिहिली आहे. तसेच प्राचीन कालीन काव्यशास्त्र ग्रंथात जेवढी उद्धरणे मिळतात ती आठव्या सर्गापर्यंतचीच आहेत. 'कुमारसंभव'चा अर्थ आहे कुमार कार्तिकेयाचा जन्म. पार्वतीच्या जन्मापासून शंकराशी तिचा विवाह इथपर्यंतची कथा हा या काव्याचा वर्ण्य विषय आहे. या काव्याचा प्रारंभ हिमालय वर्णनाने होतो. 'अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराज: । पूर्वापरो तोयनिधी वगाह्य स्थित: पृथिव्याम् इव मानदण्ड: ।'

**४) विक्रमोर्वशीय –** कालिदासाच्या कलाकृती बहुतांश पौराणिक कथा आणि इतिहास यावर आधारलेल्या आहेत. त्याच्या साहित्यातील मूळ संकल्पना रामायण, महाभारत, पुराणे यातील आहेत. या नाटकाचे कथानकही पौराणिक आहे. दिव्यांगना उर्वशी आणि राजा पुरूरवा यांच्या प्रेमसंबंधावर आधारलेले हे नाटक आहे. या नाटकाच्या नावावरूनच नाटकाच्या विषयाची कल्पना येते. हे नाटक पाच अंकी असून पहिल्याच अंकात पुरूरवा आणि उर्वशीची भेट होते. 'केशी' राक्षस उर्वशीचे हरण करतो. या प्रसंगाने नाटकाची सुरुवात होते. नांदी पद्यात शंकराची स्तुती आहे. नाटकात मानव पुरूरवा आणि देव योनीतील उर्वशी यांच्या प्रणयाची कथा आहे. दुसऱ्या अंकात राजा पुरूरवा उर्वशीच्या आठवणीत आपला मित्र, विदूषक यांच्यासह प्रमदवनात बसला असता उर्वशी आपली मैत्रीण चित्रलेखेसह तेथ येते परंतु ती राजाजवळ न जाता लांबूनच तो काय म्हणतो ते एकते, आणि राजा आपल्याबद्दलच बोलतो आहे त्याचे आपल्यावर प्रेम आहे असे म्हणून ती स्वत:चाच धिक्कार करते. ती राजासमोर जाऊ शकत नाही कारण तिने तिरस्करिणी विद्येने स्वत:ला अदृश्य केलेले असते. परंतु चित्रलेखा तिरस्करिणी विद्या सोडून महाराजांचा विजय असो असे म्हणून प्रकट होते. राजा तिला म्हणतो तुझी मैत्रिण आली असती तर जास्त आनंद झाला असता. त्यावर चित्रलेखा म्हणते आधी मेघ आणि नंतर विद्युल्लता दिसते; नंतर ती उर्वशीला येऊन सांगते तुझ्यापेक्षा जास्त निर्दयपणे मदनाने राजाला घायाळ केले आहे. म्हणून मी आज तुझ्या प्रियतमाची दूती झाले आहे. नंतर उर्वशीसुद्धा अदृश्य रूप सोडून दृश्य होते आणि राजाचा जयजयकार करते. उर्वशी निघून जाते. उर्वशीला लिहिलेले पत्र राणीला सापडते, ती राजाची निर्भत्सना करते. राजा क्षमा मागतो येथे दुसरा अंक संपतो. तिसऱ्या अंकात राजा उर्वशीची वाट पहात असतो. विदूषक त्याला म्हणतो ब्राह्मणाचे बोलणे कधी खोटे ठरत नाही आणि तेवढ्यात अभिसारकेच्या वेशात उर्वशी आकाश मार्गाने अवतरते. तेवढ्यात राणी व्रताची पूर्तता करण्यासाठी येते. परंतु उर्वशीची आणि तिची भेट होत नाही. ती गेल्यानंतर उर्वशी व पुरूरवा यांचा प्रेमालाप सुरू होतो येथे तिसरा अंक संपतो. चौथ्या अंकात पुरूरवा व उर्वशी लग्न करतात, त्यांना मुलगा होतो. उर्वशीच्या शापाप्रमाणे ती अंतर्धान पावते, राजा शोकमग्न होतो. पाचव्या अंकात मुलासह पुरूरवा आणि उर्वशीची भेट होते आणि पुढील भरतवाक्याने

नाटकाची समाप्ती होते.

''परस्परविराधिन्योरेकसंश्रयदुर्लभम् ।
सङ्गतं श्रीसरस्वत्योर्भूतयेऽस्तु सदा सताम् ।।

**५) मालविकाग्निमित्र –** हे नाटक शाकुन्तल आणि विक्रमोर्वशीय या नाटकांपेक्षा तुलनेने कमी साहित्यिक दर्जा असणारे नाटक मानले जाते. हे नाटक पाच अंकी आहे. यात नायक अग्निमित्र धीरोदात्त आहे आणि नायिका मालविका बाला आणि मुग्धा वर्णिलेली आहे. संभोगशृंगार हा या नाटकाचा प्रधान रस आहे. कथानकाला ऐतिहासिकतेच्या बरोबरीने आणि कविकल्पनेची जोड आहे. पहिल्या अंकात नांदीपठणानंतर सूत्रधार आणि पारिपार्श्वक कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' नाटक वसंतोत्सवात सादर करावयाचे आहे असे कथन करतात. आणि नाटकाला सुरुवात होते. दुसऱ्या अंकात राणी धारिणी आपल्या परिवारासह चित्र रंगवित बसली असता त्यातील एका तरुणीच्या रूपाने राजा मोहित होतो आणि तिचे नाव राणीला विचारतो परंतु तेथे असणारी कुमारी वसुलक्ष्मी आपल्या बालसुलभ स्वभावाप्रमाणे तिचे नाव मालविका आहे असे राजाला सांगते. राजा मालविकेला भेटण्याची संधी शोधत असतो. मालविका गणदासाची शिष्या असते. साभिनय नृत्य करण्यात ती निपुण असते. नृत्यशाळेत मालविका शर्मिष्ठेची भूमिका नृत्यातून साभिनय सादर करते तेव्हा राजा स्वत:ला नायक समजतो आणि 'जनमियमनुरक्तं विद्धि' असे म्हणतो. अंकाच्या शेवटी 'सर्वान्त:पुरवनिताव्यापारप्रतिनिवृत्तहृदयस्य' या श्लोकावरून ते स्पष्ट होते. तिसऱ्या अंकात नृत्यस्पधेत मालविकेचे गुरू गणदास यांची राजा अधिक प्रशंसा करतो, कारण राजाचे मालविकेवर प्रेम असते. अशोकाचे दोहद पुरविण्याची कामगिरी राणी मालविकेवर सोपविते व अशोक पाच दिवसात फुलला तर तुला हवे ते बक्षिस देऊन असे कबूल करते. राजा मालविकेची मैत्रिण मधुरिका हिला आपण मालविकेवर अनुरक्त आहेत असे सांगतो. दोलारोहनावेळी राणीला हे समजते चौथ्या अंकात मालविका आणि मधुरिकेला राणी तळघरात कोंडून ठेवते. आणि सर्पचिन्हांकित मुद्रिका दाखविल्याशिवाय कोणालाही आत सोडू नको असे द्वारपालिकेला बजावते. विदूषक साप चावल्याचे नाटक करतो व सर्पचिन्हांकीत वस्तूच्या स्पर्शानेच हे विष कमी होईल असे सांगतो. उगाच ब्राह्मणाचा जीव जायला नको म्हणून राणी सर्पचिन्हांकीत मुद्रिका देते. मालविका व मधुरिका यांची सुटका होते.

पाचव्या अंकात राणी मालविकेला वधूवेषात तयार करून प्रमदवनात आणते. आणि राजाला येण्यास सांगते. तिथे विदर्भातील दोन शिल्पकार येतात. ते मालविकेला ओळखतात. ती राजा माधवसेनाची भगिनी असल्याचे त्यांच्याबरोबर आलेली परिव्राजिका सांगते. आपला पुत्र वसुमित्राचे युद्धातील विजयाबद्दल राजा अभिनंदन करतो. राणीसुद्धा राजाचे आणि मालविकेचे लग्न लावून देते. येथे नाटक संपते.

**६) अभिज्ञानशाकुन्तल –** कालिदासाच्या या नाटकाची गणना विश्वसाहित्यात होते. या नाटकाचे कथानक महाभारतातील उपकथानकावर आधारलेले आहे. या नाटकाचा नायक चक्रवर्ती राजा दुष्यंत आहे आणि नायिका विश्वामित्र आणि मेनका यांची कन्या शकुंतला. शकुंतला कण्वांच्या आश्रमातच मोठी झाल्यामुळे ती कण्व ऋषींची मानसकन्या आहे. दुष्यंत आणि शकुंतला यांची भेट कण्व ऋषींच्या आश्रमात होते. यज्ञरक्षणासाठी राजाचा मुक्काम आश्रमात असतो. दोघे एकमेकांवर अनुरक्त होऊन गान्धर्व पद्धतीने विवाह करतात. पुढे राजा आपल्या राजधानीला परत जातो ते शकुन्तलेला सन्मानाने घेऊन जाण्याचे वचन

देऊनच. परंतु दुष्यन्ताच्या चिंतनात मग्न असल्यामुळे आपल्याकडे शकुंतलेचे दुर्लक्ष झाले असे मानून रागावलेले दुर्वास 'तू ज्याचे चिंतन करीत आहेस त्याला तुझा विसर पडेल' असा शाप देतात. त्यानंतर आर्जवे-विनंत्या केल्यामुळे खुणेची वस्तू (अभिज्ञान) दाखविल्यावरच राजाला ओळख पटेल असा उःशाप दुर्वास देतात. परंतु ती अंगठी हरवते. माशाच्या पोटात एका कोळ्याला सापडते. ती अंगठी पाहिल्यावर राजाला शकुंतलेचे स्मरण होते आणि तो तिचा स्वीकार करतो असे नाटकाचे कथानक आहे.

या नाटकात शृंगाररस तर आहेच, परंतु करुण, रौद्र, वीर हे रससुद्धा आहेत आणि उपमा तर आहेतच आहेत.

शाकुंतल नाटकाचे महत्त्व सांगताना असे म्हटले जाते, ''काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्या शकुन्तला। तत्रापि च चतुर्थोऽङ्कः तत्र श्लोकचतुष्टयम्।'

शाकुंतलाबद्दल आणि एकूणच कालिदासाच्या साहित्याबद्दल लिहावे तेवढे थोडेच आहे.

**७) रघुवंश –** रघुवंश काव्याचा मूल स्रोत म्हणजे वाल्मीकिरामायण, वाल्मीकिरामायणाच्या बालकाण्डातील तिसऱ्या सर्गातील नववा श्लोक आणि युद्ध काण्डातील प्रथम सर्गातील अकरावा श्लोक यामध्ये 'रघुवंश' हा शब्द आला आहे. चरित्र चित्रणात पारंगत असणाऱ्या कालिदासाने ग्रंथाच्या नामकरणासाठी हाच शब्द वापरला. नवव्या सर्गापासून पंधराव्या सर्गापर्यंत कालिदासाने रामकथेसाठी वाल्मिकीरामायणाचाच आधार घेतला आहे. रघूच्या नावावरूनही रघुवंश हे नाव दिले असावे. तसेच 'हरिवंश' या नावावरूनही 'रघुवंश' या नावाची प्रेरणा मिळाली असावी. या संदर्भात रामजी उपाध्याय (१९७३, पृ. ३९) म्हणतात. 'हरिवंश' इति 'रघुवंशस्य' नामादर्शः । हरिवंशे रघुवंशीयानां नामावलिः वर्तते । तत्र दिलीपात् पूर्वभवा अग्निवर्णस्य च पश्चात्भवा राजानोऽपि परिकीर्तिताः । रघुवंशस्य नामावलिः हरिवंशस्य नामावल्यां साम्यमारोहति ।

'अश्मकवंश' 'यदुवंश' 'दिलीपवंश' ही वंशकाव्याची इतर उदाहरणे आहेत. ऐतिहासिक महाकाव्याच्या काळातही अशा प्रकारची वंशकाव्ये लिहिली गेली. (त्रिपाठी राधावल्लभ १९९७, पृ. २५)

कालिदासाच्या महाकाव्यात रघुवंशाला फार वरचे स्थान आहे. यातील काव्यसौंदर्य, भाषा, भाव, कला, सर्वाङ्गीणता वगैरे गुण उच्चश्रेणीचे आहेत. समीक्षकांनी रघुवंशाला अधिक महत्त्व दिले आहे. ही कालिदासाची सर्वोत्कृष्ट कृती मानली जाते. या काव्यामध्ये शृंगार, वीर, रौद्र, करुण, बीभत्स, अद्भुत, शांत वगैरे रस प्रभावीपणे आले आहेत. म्हणून या काव्यामुळे कालिदासाला 'रसेश्वर' अशी उपाधी दिली तर वावगे ठरणार नाही. भाव, भाषा, अलंकार वगैरे सर्वच दृष्टीने हे काव्य अद्भुत आहे. यात अधिकतर अर्थालंकार, उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास, निदर्शना यांचा उपयोग आहे. 'उपमा कालिदासस्य' ही उक्ती रघुवंशाच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते. काव्याच्या सुरुवातीलाच 'वागर्थाविव सम्पृक्तौ ।' या पहिल्याच श्लोकापासून सार्थक आणि सारगर्भित उपमांना सुरुवात होते.

रघुवंश एकोणीस सर्गाचे महाकाव्य आहे. यात दिलीपापासून अग्निवर्णापर्यंत इक्ष्वाकुवंशीय एकोणतीस राजांचे वर्णन आहे. रघूचा पराक्रम, शौर्य, दानशीलता आणि प्रजानुरंजन इत्यादि गुणांमुळे या कुलाचे नाव 'रघुवंश' पडले आणि त्यामुळे कवीने आपल्या काव्याला रघुवंश नाव दिले. एक ते नऊ सर्गापर्यंत राजा दिलीप, रघु, अज आणि दशरथाचे वर्णन आहे. दहा ते पंधरा या सर्गांमध्ये रामाची कथा आहे आणि पंधरा ते एकोणीसमध्ये कुश, अतिथि आणि त्याचे उत्तराधिकारी यांच्यासह अग्निवर्णापर्यंतचे वर्णन आहे. शेवटच्या सर्गात अग्निवर्णाच्या विलासी जीवनाचे चित्रण आहे. अतिविलासी वृत्तीचा परिणाम कवीने

परिणामकारकरीत्या वर्णिला आहे.

रघुवंशाचे महत्त्व केवळ साहित्य आणि काव्यगुण या दृष्टीनेच आहे असे नाही तर कालिदासाने तत्कालीन समाज आणि समाजमान्यता यानुसार प्रशासकीय आणि सामाजिक आदर्श प्रस्तुत केले आहेत. रघुवंशीय राजांच्या वर्णनात कुशल राजकर्त्याबरोबरच प्रजेबद्दल राजाचे कर्तव्य याचाही विचार मांडला आहे. राजा लौकिक उपभोगासाठी नाही तर प्रजेसाठी राज्य करतो. प्रजेचे कल्याण करण्यासाठी प्रजेकडून कर घेतो. 'प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत्' (१-१८) राजा प्रजेला नम्र बनवतो, तिचे रक्षण, भरणपोषण करतो. ''प्रजानां विनयाधानात् रक्षणात् भरणादपि । स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतव: ।।'' (१-२४) तो प्रजेचे रंजन करतो. प्रजेला आनंदित करतो म्हणून त्याला राजा म्हणतात, ''तथैव सोऽभूदन्वर्थो राजा प्रकृतिरञ्जनात् ।' प्रजेचे रक्षण करणे राजाचे कर्तव्य आहे. 'क्षतात् किल त्रायत इत्युदग्र: क्षत्रस्य शब्द: भुवनेषु रूढ:।'' (२-५३)

रघुवंशात कवीने सामाजिक आदर्शाचे सविस्तर वर्णन केले आहे. आई, वडील, भाऊ, पत्नी, पुत्र, गुरू, शिष्य वगैरे परस्पर संबंधांचा, राजाच्या कर्तव्याचा, ऋषी, ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या निष्ठांचा, आश्रमव्यवस्था आणि संस्कार यांचा निर्देश काव्यात वारंवार आला आहे. दिलीप आणि दशरथाच्या वर्णनात आदर्श पितृत्व, भरत आणि लक्ष्मणाच्या चरित्रात भ्रातृप्रेम आणि कर्तव्यपरायणता, राम आणि सीता चरित्रात पति-पत्नी, वाल्मीकि, दिलीप वगैरेंच्या वर्णनातून गुरु-शिष्य संबंध सविस्तर सांगितले आहेत. कालिदासाचे असे मत आहे की संस्कार करणे गृहस्थाचे कर्तव्य आहे. मुलांवर होणाऱ्या संस्काराचे वर्णन अनेक ठिकाणी आले आहे. ''कुमारा: कृतसंस्कारास्ते धात्रीस्तन्यपायिन: । स जातकर्मण्यखिले तपस्विना तपोवनादेत्यपुरोधसा कृते ।''(३.१८)

'प्रजायै गृहमेधिनाम्'' या श्लोकामधून विवाह केवळ भोग विलासासाठी नाही तर संतानोत्पत्ती करून वंशपरंपरा टिकविण्यासाठी विवाह करावा हा विचार कालिदास मांडतो. रघुवंशीय राजे वृद्धावस्थेत राज्यभार मुलांवर सोपवून वानप्रस्थ स्वीकारून तपस्या करण्यासाठी वनात जात. हे आदर्श आचरण कवीने 'वार्धक्ये मुनिवृत्तीनाम् ।' या श्लोकांशाद्वारे सूचित केले आहे.

रघुवंश महाकाव्यात साहित्य, कला, सांस्कृतिक आदर्शाची परिपूर्णता आहे. रघुवंशाची कथा, चरित्रचित्रण, प्रकृतिचित्रण, भाषा, भाव, कल्पना, रसनिष्पत्ती, अलंकारयोजना अद्भुत, निर्दोष आणि मनोहर आहेत. तसेच हे काव्य तत्कालिन समाजस्थितीचे आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व करते.

### रघुवंश कथावस्तू

या महाकाव्यात एकाच व्यक्तीचे चरित्रवर्णन नाही तर जवळजवळ एकोणतीस रघुवंशीय राजांचे वर्णन आहे. राजा दिलीपापासून ते अग्निवर्णापर्यंतचे वर्णन यात आहे.

रघुवंशाचा सर्गनिहाय तपशील पुढीप्रमाणे देता येईल.

सूर्यप्रभव रघुवंशाच्या वर्णनाने प्रथमसर्गाची सुरुवात होते. राजा दिलीपाचे चरित्रवर्णन, राजा दिलीप पुत्रप्राप्तीसाठी सुदक्षिणेसह कुलगुरू वसिष्ठांच्या आश्रमात जातो. वसिष्ठांच्याच आश्रमात असलेल्या कामधेनूच्या मुलीची, नंदिनीची सेवा करण्याची आज्ञा गुरू वसिष्ठ दिलीपाला देतात. इथे पहिला सर्ग संपतो.

दुसऱ्या सर्गात राजा दिलीपांची गोसेवा वर्णन केली आहे. सुदक्षिणेसह राजा दिलीप नंदिनीची सेवा करीत असताना नंदिनी राजाच्या भक्तीची परीक्षा घेते. हिमालयाच्या गुहेत गेलेली नंदिनी एका सिंहाच्या

तावडीत सापडते. राजा सिंहाला नंदिनीला मुक्त करण्याची विनंती करतो. परंतु सिंह त्याची विनंती अव्हेरतो. शेवटी राजा सिंहाला स्वत:चं शरीर अर्पण करण्याची तयारी दाखवतो. परंतु त्याच्यावर सिंहाची झडप पडण्याऐवजी आकाशातून पुष्पवृष्टी होते. शेवटी नंदिनीने मायावी सिंह निर्माण करून दिलीपाची परीक्षा पाहिली होती. हे स्पष्ट होते. नंदिनी राजाच्या भक्तीने प्रसन्न होऊन त्याला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद देते आणि आपले दूध प्राशन करण्यास सांगते. राजा आश्रमात येऊन सर्व प्रकार वसिष्ठ मुनींना सांगतो. तो गुरूंच्या आज्ञेने नंदिनीचे दूध प्राशन करतो आणि उद्दिष्टप्राप्तीच्या आनंदात राजधानीत पोहोचतो. येथे दुसरा सर्ग संपतो.

तिसऱ्या सर्गात रघूचे बालपण, शिक्षण आणि युवराज पदाचे वर्णन आहे. अश्वमेध यज्ञाचे आयोजन करून रघू आपल्या पित्याकडून, राजा दिलीपाकडून राज्य ग्रहण करतो. राजा दिलीप व सुदक्षिणा रघूकडे राज्य सोपवून वनात निघून जातात.

चौथ्या सर्गात रघूच्या दिग्विजयानंतर विश्वजित् यज्ञाचे वर्णन आहे.

पाचव्या सर्गात रघूची दानशीलता वर्णन केली आहे. विश्वजित् यज्ञामध्ये सर्व गोष्टीचे दान करायचे असल्यामुळे खजिना रिक्त होतो. त्याचवेळी कौत्स नावाचा वरतंतु ऋषींचा शिष्य, स्नातक ब्रह्मचारी, गुरुदक्षिणा देण्यासाठी चौदा करोड सुवर्ण मुद्रांची याचना करतो. त्यासाठी कुबेर सुवर्ण मुद्रांचा पाऊस पाडतो. कौत्स स्वत:ला अपेक्षित तेवढ्याच सुवर्णमुद्रा घेतो. रघुला पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद देऊन निघून जातो.

सहाव्या सर्गात रघुपुत्र अजाच्या जन्माचे वर्णन येते. याच सर्गात त्याचा विवाह विदर्भ राजकन्या इन्दुमतीशी होतो. यात वेगवेगळ्या राजांचे त्यांच्या गुणांचे, वंशाचे, शौर्याचे, समृद्धी आणि राज्यांची सीमा यांचे वर्णन आले आहे.

सातव्या सर्गात राजा अजाचे नगरभ्रमण आणि इन्दुमतीसह स्वत:च्या नगरात प्रवेश याचे वर्णन आहे.

आठव्या सर्गात रघूचा राज्यत्याग, दशरथाचा जन्म, इन्दुमतीचा मृत्यू, अजाचा विलाप आणि शरीरत्याग इत्यादिंचा समावेश आहे.

नववा सर्ग दशरथाच्या स्तुतीने सुरू होतो. दशरथाच्या हातून चुकीने झालेला श्रावणवध श्रावणाच्या माता-पित्यांनी दशरथाला दिलेला शाप इ. वर्णन आहे.

दहाव्या सर्गात राम इत्यादी चारही भावाचा जन्म व त्यांचे बालपण यांचे वर्णन आहे.

अकराव्या सर्गात राम-लक्ष्मणाचे विश्वामित्र ऋषींसह वनगमन, धनुष्ययज्ञ दर्शन, मिथिला प्रस्थान, धनुष्य भञ्जन, चारही भावांचा सीता आणि तिच्या बहिणींसह विवाह. परशुराम संवाद वगैरे याच सर्गात आहे.

बाराव्या सर्गात राज्याभिषेक, कैकेयी वर प्रदान, रामाचे सीता व लक्ष्मणासह वनगमन, शूर्पणखाख्यान, सीताहरण, वनराज सुग्रीवाचा राज्याभिषेक, राम-रावण युद्ध आणि रावणाचा वध यांचे वर्णन आहे.

तेराव्या सर्गात राम-लक्ष्मण, सीता यांचे पुष्पक विमानाने अयोध्येला आगमन आणि भरत भेट वर्णिली आहे.

चौदाव्या सर्गात सीतेला गर्भधारणा, रामाकडून सीतेचा परित्याग आणि लक्ष्मणाने सीतेला वाल्मीकिच्या आश्रमात पोचविणे इ. गोष्टी वर्णन केल्या आहेत.

पंधराव्या सर्गात रामाचे वंशज, लव-कुश यांचा जन्म, अश्वमेध यज्ञ, शम्बूक वध, पृथ्वीने सीतेला स्वत:मध्ये सामावून घेणे आणि रामाचे स्वर्गगमन इथपर्यंतचा भाग आहे.

सोळाव्या सर्गात लव-कुश आणि त्यांच्या चुलत बंधूंचे राज्यशासन, विवाह, अयोध्येच्या नगर देवतेकडून विनंती केल्यानंतर कुशाने अयोध्येत राज्यसूत्र स्वीकारणे, इत्यादी घटना वर्णिल्या आहेत. कुशाच्या जलक्रीडेचे सुंदर वर्णन याच सर्गात आहे.

सतराव्या सर्गात कुशाचा मुलगा अतिथी याच्या पराक्रमाचे आणि यशोगाथेचे वर्णन आहे.

अठराव्या सर्गात अतिथीचा पुत्र निषध, निषधपुत्र नल, नलपुत्र शील, शीलपुत्र उन्नाथ, उन्नाथपुत्र वज्रनाथ, वज्रनाथपुत्र शंखण, शंखणपुत्र व्युषिताश्व, व्युषिताश्वपुत्र विश्वसह, विश्वसहपुत्र हिरण्यनाथ, हिरण्यनाथपुत्र कौशल्य, कौशल्यपुत्र पुष्य, पुष्यपुत्र ध्रुवसन्धि, ध्रुवसन्धिपुत्र सुदर्शन या राजांचे वर्णन आहे.

एकोणिसाव्या सर्गात सूर्यवंशाचा शेवटचा राजा अग्निवर्ण याच्या विलासी जीवनाचे चित्रण आहे. अतिविलासी आयुष्य जगण्यामुळे अग्निवर्णाला क्षयरोग होतो. त्यातच तो मरण पावतो. त्याच्यानंतर त्याची महाराणी मंत्र्याच्या मदतीने राज्य सांभाळते. येथे शेवटचा सर्ग अणि रघुवंश महाकाव्य संपते.

## रघुवंशाचे टीकाकार

कोणतीही कलाकृती ही चिकित्सकपणे, गुण ग्राहकतेने रसिकतेने आस्वादण्याचा आणि अभ्यासण्याचा विषय असतो. म्हणूनच कालिदासाच्या वाङ्मयावर अनेक टीका लिहिल्या गेल्या आहेत. प्राचीन काळी कालिदासावर टीका लिहिणे विद्वत्तेचे गमक मानले जाई. कोणतेही धर्म अगर पंथ टीकाकाराच्या आडे आलेले दिसत नाहीत. कालिदासाच्या साहित्याचे खऱ्या अर्थाने आकलन होते ते त्याच्या टीकावाङ्मयाचा अभ्यास करताना.

रघुवंश या एकाच महाकाव्यावर चाळीसच्यावर टीका आढळतात. परंतु त्या सगळ्याच काही प्रकाशित नाहीत. त्यातील आठच टीका प्रकाशित आहेत. या सर्व टीकांची यादी पुढीलप्रमाणे देता येईल.

| **टीकेचे नाव** | **टीकाकार** | **प्रकाशित/अप्रकाशित** | **कालखंड** |
|---|---|---|---|
| १) टीका (कथंभूतिनी) | वल्लभदेव | प्रकाशित | १० वे शतक |
| २) शिशुहितैषिणी | चारित्रवर्धन | अप्रकाशित | ११६३-१३८५ इ.स. |
| ३) रघुवंशदर्पण | हेमाद्रि | प्रकाशित | १२६०-१३०९ इ.स. |
| ४) रघुवंशटीका | दक्षिणावर्तनाथ | प्रकाशित | १२ वे शतक |
| ५) सुबोधिनी | दिनकर | अप्रकाशित | १३८५ इ.स. |
| ६) टीका | जिनसमुद्रसूरी | अप्रकाशित | १४५०-९९ इ.स. |
| ७) टीका | भगीरथ | अप्रकाशित | १४२१ इ.स. |
| ८) संजीवनी | मल्लिनाथ | प्रकाशित | १४वे शतक |
| ९) प्रकाशिका | अरुणगिरिनाथ | प्रकाशित | १५०० इ.स. |
| १०) पदार्थदीपिका | नारायणपण्डित | प्रकाशित | १५०० इ.,. |
| ११) विशेषार्थबोधिका | गुणविजयगणि | प्रकाशित | १५९० इ.स. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) पञ्जिका | समयसुन्दर | अप्रकाशित | १६३६ इ.स. |
| १३) टीका | सुमती विजय | अप्रकाशित | १६३५ - ४२ इ.स. |
| १४) व्याख्या | विजयानन्द | अप्रकाशित | १६८३ इ.स. |
| १५) पदार्थदीपिका | नारायण | अप्रकाशित | १५४५ इ.स. |
| १६) टीका | क्षेमहंस | अप्रकाशित | १६ वे शतक |
| १७) टीका | विजयसूरी | अप्रकाशित | १६०९ इ.स. |
| १८) टीका | महिमसिंह | अप्रकाशित | १६९३ इ.स. |
| १९) टीका | मेघविजयगणि | अप्रकाशित | १६७१ इ.स. |
| २०) सुबोधिनी | गुणरत्न | अप्रकाशित | १६११ इ. स. |
| २१) टीका | मलयसुन्दसूरी | अप्रकाशित | १६१८ इ.स. |
| २२) रघुवंशटीका | धर्ममेरू | प्रकाशित | १७ वे शतक |
| २३) टीका | गोपीनाथ | अप्रकाशित | १७ वे शतक |
| २४) रघुवंशसूत्रवृत्ति | विजयानन्दसूरीशिष्य | अप्रकाशित | १७०७ इ.स. |
| २५) टीका | रत्नचन्द्रगणि | अप्रकाशित | १७ वे शतक |
| २६) टीका | पुण्यहर्ष | अप्रकाशित | १८ वे शतक |
| २७) रघुवंशटीका | गुणविजयगणि | अप्रकाशित | ? |
| २९) सन्देहविषोषधि: | कृष्णभट्ट | अप्रकाशित | ? |
| ३०) तत्त्वार्थदीपिका | नवनीत | अप्रकाशित | ? |
| ३१) दुर्घटसंग्रह | राजकुन्द | अप्रकाशित | ? |
| ३२) अर्थालापनिका | आनन्दयतिवल्लभ | अप्रकाशित | ? |
| ३३) विवरणम् | जयसिंह | अप्रकाशित | ? |
| ३४) विस्तर | विजयगणि | अप्रकाशित | ? |
| ३५) टीका | महेश्वर | अप्रकाशित | ? |
| ३६) प्रकाश | शशिधर: | अप्रकाशित | ? |
| ३७) अलंकाररत्नावली | भीमसेन दीक्षित | अप्रकाशित | ? |
| ३८) रघुवंशटीका | रत्नचन्द्र | अप्रकाशित | ? |
| ३९) प्रकाशिका (रघुकाव्यार्थदीपिका) | हरिदास मिश्र | अप्रकाशित | ? |
| ४०) टीका | समयसुन्दरोपाध्याय | अप्रकाशित | ? |
| ४१) मेघलता | अज्ञातकण्टक | अप्रकाशित | ? |
| ४२) टीका | हेमसूरी | अप्रकाशित | ? |

### रघुवंशाचे जैनेतर टीकाकार (प्रकाशित)

रघुवंशाचे वर पाहिल्याप्रमाणे चाळीसहून अधिक टीकाकार आहेत. त्यात बहुतांश जैन टीकाकारांचा समावेश आहे. जैनेतर टीकाकारांपैकी ज्या टीका प्रकाशित आहेत त्यांचीच थोडक्यात माहिती घेऊ.

**१) मल्लिनाथ –** (इ.स. १३५० ते १४५० मध्ये कधीतरी) 'कोलाचल मल्लिनाथ' असे त्याचे नाव असून त्यावरून तो आन्ध्र प्रदेशातील असावा. त्याचा टीकेतील उद्धरणावरून तो व्याकरण, ज्योतिष, स्मृति व षड्दर्शने यात पारंगत असावा. हा संस्कृत साहित्याचा एक सक्षम टीकाकार आहे. त्याने कालिदासाच्या 'रघुवंश', 'कुमारसंभव' आणि 'मेघदूत' या तीनही काव्यावर टीका लिहिल्या आहेत. मल्लिनाथाची 'संजीवनी' ही टीका सर्वत्र उपलब्ध आहे. मल्लिनाथाने आपले निकटवर्ती टीककार वल्लभदेव आणि दक्षिणावर्तनाथ यांचा उल्लेख वारंवार केला आहे. त्यांच्या टीकेवरून चिकित्सक वृत्ती प्रत्ययाला येते. आपण कालिदासाच्या काव्यावर टीका का लिहिली याचे प्रयोजन देताना मल्लिनाथ म्हणतो.

''भारती कालिदासस्य दुर्व्याख्याविषमूर्च्छिता ।
एषा संजीवनी टीका तामद्योज्जीवयिष्यति ।।

**२) अरुणगिरिनाथ** (इ. स. १५००) – रघुवंशाच्या टीकाकारामध्ये दक्षिणावर्तनाथ आणि मल्लिनाथ यांच्या बरोबरीनेच अरुणगिरिनाथ याचेही नाव घेतले जाते. अरुणगिरिनाथाने पूर्वीच्या टीकांचा यथोचित अभ्यास करून एक सर्वांगपूर्ण टीका लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. काव्यशास्त्र आणि इतर शास्त्रे यांचा त्यांनी केलेला अभ्यासाचा प्रभाव या टीकेत जाणवतो. 'रघुवंशप्रकाशिका' या आपल्या टीकाग्रंथाच्या पूर्वपीठिकेमध्ये ते म्हणतात, ''आलोच्य पूर्वं टीकांश्च लक्षणानि च धीमताम् । विनिर्मिता मया सेयं सोपयोगा भविष्यति ।। (प्रकाशिका भाग १. पृ. १) अरुणगिरिनाथाची अशी प्रतिज्ञा आहे की मी अशा प्रकारची टीका लिहीन की त्यांच्या पूर्वीच्या टीका उपलब्ध झाल्या तरी त्यांची टीका निरर्थक ठरणार नाही. जी आधीच्या टीकाकारांना पुढे घेऊन जाऊ शकेल. अरुणगिरिनाथाची भूमिका समन्वयाची आहे. तो काव्यात अलंकार आवश्यक मानतो. काव्यगुणांवर त्यांची बारीक नजर आहे. अरुणगिरिनाथानी टीकेच्या पद्धतीची स्पष्ट केलेली भूमिका इतर आधुनिक टीकाकारांनाही मार्गदर्शक ठरू शकते.

''वाक्यर्थतत्त्वावगमो नालङ्कारगति विना । ततो मयार्थालङ्कारा बाहुल्येनात्रदर्शिता: । ही टीका प्रकाशित आहे. (पोडूवाल के. अच्युत १९५९, भाग १ पृ. २)

**३) नारायण पंडित –** (१५०० इ.स.) यांनी रघुवंशावर 'पदार्थदीपिका' अशी टीका आहे. त्यांनी आपल्या टीकेत अरुणगिरिनाथाचे अनुकरण केले आहे. यांच्या टीकेत फारशी स्पष्टीकरणे नाहीत. नारायण पंडित चौदाव्या सर्गाची टीका ३१ व्या श्लोकापर्यंतच लिहितात. ''इत: परं दुष्प्रमेयत्वान्न लिख्यते'' असे म्हणून दहा वेगळे श्लोक लिहून तो सर्ग संपवितात. त्यांच्या टीकेचे समाप्तिवाक्य 'इति श्रीकृष्णप्रियशिष्यस्य नारायणकृतौ रघुवंशव्याख्यायां पदार्थदीपिकायां चतुर्दश: सर्ग: । असे आहे. ही टीका प्रकाशित आहे. (राधावल्लभ त्रिपाठी राधावल्लभ १९९७, पृ. २७)

**कालिदासाचे जैन टीकाकार**

जैन पंथीयांनी केवळ स्वतंत्र साहित्याचीच निर्मिती केली आहे असे नाही तर येणाऱ्या पिढीला इतर साहित्याचा बोध व्हावा यासाठी टीका साहित्यही रचले आहे. सांप्रदायिकतेचा मोह सोडून जैन टीकाकारांनी संस्कृत ग्रंथावर बहुविध टीका लिहिल्या आहेत. पंधराव्या आणि सोळाव्या शतकात जैन विद्वानांमध्ये अनेक टीकाकार होऊन गेले, ज्यांनी स्वतंत्र काव्यनिर्मितीपेक्षा टीका वाङ्मयनिर्मिती हे आपले जीवनध्येय

मानले. नास्तिक आणि आस्तिक दर्शनांचे अन्त:संबंध जैन टीका वाङ्मय समृद्ध होण्याचे मुख्य कारण आहे. नास्तिक आणि आस्तिक दर्शनाचे अनुयायी वादसभेत एकत्र येत असत. वादसभेत एकमेकांच्या सिद्धान्तावर टीकाटिप्पणी होई. या वादसभा संस्कृत भाषेत होत असत. म्हणून जैन आणि बौद्ध पंथीयांना संस्कृत भाषेचा अभ्यास आवश्यक असे. संस्कृत भाषेचा सर्वांगीण अभ्यास सुकर व्हावा म्हणून पाठशाळामधून संस्कृत साहित्याचा अभ्यास करण्यात येई. कालिदासाच्या रघुवंश या महाकाव्याचा अभ्यास याच कारणास्तव झाला असावा.

**रघुवंशाचे काही महत्त्वाचे जैन टीकाकार**

१) वल्लभदेव – १० वे शतक
२) चरित्रवर्धन – शिशुहितैषिणी – ११७३–१३८५ इ.स.
३) हेमाद्रि दर्पण – १२६० इ.स.
४) गुणविजय – विशेषार्थबोधिका (१६४६ वि. सं.) १५९० इ.स.
५) क्षेमहंस – टीका– १६ वे शतक
६) गुणरत्न – सुबोधिनी (१६६७ वि. सं.) १६११ इ.स.
७) समयसुन्दर – अर्थलापनिका (१६९२ वि. स.) १६३६ इ.स.
८) जिनसमुद्रसूरी – टीका – १६ वे शतक
९) सुमतीविजय – सुगमान्वया (१६९८ वि. सं.) १६४२ इ.स.
१०) धर्ममेरू – रघुटीका – १७ वे शतक
११) विजयानन्दसूरीशिष्य – रघुवंशसूत्रवृत्ती (१७६३ वि. सं.) १७०७ इ.स.
१२) रत्नचन्द्रमणी – टीका – १७ वे शतक
१३) पुण्य हर्ष – टीका – १८ वे शतक
१४) श्री. विजयगणी – टीका सुबोधिका
१५) हेमसूरी – टीका
१६) मलयसुन्दरसूरी – टीका

**१) वल्लभ –** कालिदासाच्या टीकाकारांमध्ये वल्लभदेव सर्वांत प्राचीन टीकाकार आहे. वल्लभदेवाने कालिदासाच्या रघुवंश, कुमारसंभव आणि मेघदूत या तीनही काव्यावर टीका लिहिली आहे. वल्लभाचा काळ दहावे शतक असा आहे. त्याच्या टीकेचे नाव. ‘कुमारसंभवपंजिका’, ‘रघुवंशपंजिका’ असे आहे. ही आत्तापर्यंत हस्तलिखित स्वरूपातच उपलब्ध होती, परंतु गुडॉल यांनी २०१४ मध्ये ती प्रकाशित केली आहे. वल्लभची कुमारसंभव पजिका ही टीका आठव्या सर्गापर्यन्तच आहे. ही टीका लघुटीका आणि बृहत्‌टीका अशा दोन प्रकारे प्रसिद्ध आहे (त्रिपाठी १९९७, पृ.४२). मेघदूताची ही सर्वात प्राचीन टीका वल्लभदेवाचीच आहे.

**२) हेमाद्रि –** हेमाद्रिच्या वडिलांचे नाव ईश्वरसूरी. याने ‘रघुवंशदर्पण’ नावाची टीका लिहिली आहे. हेमाद्रिची ‘रघुवंशदर्पण’टीका दुसऱ्या सर्गापासून उपलब्ध आहे आणि प्रकाशितही आहे. यादवकालीन

हेमाद्रि आणि दर्पणकार हेमाद्रि वेगळे आहेत. (पी. के. गोडे, १९५३, पृ. १८७)

**३) दिनकर –** इ.स. १३८५ धर्मांगद आणि कमला यांचा हा पुत्र. दिनकराची टीका म्हणजे चारित्रवर्धनाचे अनुकरण वाटते. तो प्रभाकर या टीकाकाराचा निर्देश करतो. रघुवंश, कुमारसंभव, शिशुपालवध, राघवपाण्डवीय, मेघदूत यावर त्याने टीका लिहील्या आहे. त्याची रघुवंशावरील ‘सुबोधिनी’ ही टीका अप्रकाशित आहे.

**४) सुमतिविजय –** ‘सुगमान्वया’ ही सुमतिविजयाची टीका भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ, पुणे येथे आहे (नं. ४६ १८७३-७४) या हस्तलिखिताची लिपी देवनागरी आहे. हस्तलिखित मुंबई शासनासाठी डॉ. बुल्हेर यांनी बिकानेर येथून आणले. यात पूर्ण १९ सर्ग आहेत. पूर्णपणे अभ्यासून व तपासून आणलेली ही टीका मूळग्रंथ आणि टीका अशा स्वरूपात आहे. या टीकेत जास्त उदाहरणे नाहीत. काही उदाहरणे श्रुती, स्मृती आणि नीती आणि काही इतर साहित्यातली असून थोडीफार अभिधानचिंतामणीतील आहेत. या टीकेला ‘वृत्ती’ म्हणता येईल. शब्दाला प्रतिशब्द देणे या पुरतीच ही टीका मर्यादित आहे. ती कुठल्याही विधानांनी, उदाहरणांनी किंवा स्पष्टीकरणांनी युक्त नाही. यात व्याकरणविषयक टीपा अगदीच तुरळक आढळतात. या टीकेवर शिशुहितैषिणी, कथंभूतिनी, पञ्जिका यांचा प्रभाव जाणवतो. चारित्रवर्धनानंतर खूप दिवसांनी ही टीका निर्माण झाली. त्या काळातील हा आधुनिक टीकाकार होता. सुमतिविजय आपल्या टीकेची सुरुवात अशी करतो. ‘‘श्री भगवत्यै नम: । प्रणम्य जगदाधीशं गुरून्सद्भारतीमलं वामाङ्गप्रभवं ज्ञात्वा वृत्तिमत्यां हि दुर्घटाम् ।।१।। सुमतिविजयाख्येन क्रियते सुगमान्वया टीका श्रीरघुकाव्यस्य मयेयं शिशुहेतवे ।

**५) विजयगणी –** यांची सुबोधिका ही टीका हस्तलिखित स्वरूपात भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ पुणे येथे उपलब्ध आहे. (नं. ४४-१८-७४) हस्तलिखिताची लिपी देवनागरी असून शैली जैन आहे. या टीकेचा एकच सर्ग उपलब्ध आहे, त्याचा काळ निश्चित नाही. तीनशे वर्षांपूर्वी डॉ. वुल्हेर यांनी मुंबई शासनासाठी वृंदावन येथून आणली. काही भाग पुण्यातील श्रीधरशास्त्री लिमये यांच्याकडून उपलब्ध झाला. पण्डित विजयगणी हे पण्डित रामविजय यांचे शिष्य होते. ही टीका म्हणजे मूळ काव्याचे भाषांतरच म्हणावे लागेल. यात फारसे संदर्भ किंवा उदाहरणे नाहीत किंवा व्याकरण, नियम स्पष्टीकरणेही नाहीत. श्रुती, स्मृती आणि नीतीमधूनही काही उदाहरणे घेतली आहेत. इतर टीकाकाराप्रमाणे त्याने कुठल्याही कोशातून किंवा साहित्यातून संदर्भ घेतलेले नाहीत. विजयगणी आपल्या टीकेचा समारोप पुढीलप्रमाणे करतो. ‘‘इति श्रीतपगच्छीय पण्डितरामविजयगणी – चरणसेवित पण्डित श्रीविजयगणी समर्थितायां रघुवंशमहाकाव्यव्याख्यायां सुबोधिकासमाख्यायां नवम: सर्ग: ।

**६) धर्ममेरु –** धर्ममेरुने रघुवंशावर केलेल्या टीकेचे नाव ‘रघुटीका’ असे आहे. याची हस्तलिखिते भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ या ग्रंथसंग्रहालयामध्ये जतन केलेली आहेत. या टीकेचे पहिले नऊ सर्ग आणि बारा श्लोक उपलब्ध आहेत. ही कथंभूतिनी प्रकारची टीका आहे. यात फक्त प्रतिशब्द आहेत. उदाहरणे, स्पष्टीकरणे किंवा व्याकरणाच्या टीपा फारशा नाहीत. काही उतारे स्मृती आणि शतकामधून घेतले

आहेत. यातील उदाहरणे इतर टीकांप्रमाणे उच्च प्रतीच्या साहित्यातून किंवा कोशातून आलेली नाहीत. ही टीका फारशी अभ्यासपूर्ण नाही. या टीकेची सुरुवात किंवा समारोप दोन्हीही उपलब्ध नाहीत. त्यामुळे लेखकाची विशेष माहिती देता येत नाही.

**७) विजयानंन्दसूरिशिष्य (इ.स. १७०७)** – याच्या रघुवंशसूत्रवृत्ति (नंदर्गीकर, १९८२, पृ. ४०) या टीकेच्या सुरुवातीला किंवा शेवटी टीकाकाराचे नाव नाही. त्याने आपल्या गुरूचे नाव दिले आहे. तो स्वत:ला विजयानन्दसूरिशिष्य मानतो. या टीकेची हस्तलिखित प्रत भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ पुणे येथे उपलब्ध आहे. लिपी जैननागरी आहे, या टीकेचे वल्लभाच्या पञ्जिकेशी साम्य आहे. तो स्मृती, नीती आणि भगवत् गीतेचे संदर्भ देतो. स्पष्टीकरणे थोडक्यात आढळतात. तो वल्लभ, दक्षिणावर्तनाथ, कृष्णभट्ट, चारित्रवर्धन यांचे संदर्भ देतो. टीकेचा समारोप करताना तो आपली माहिती देतो, ''संवत् १७६३ वर्षे वैशाखे वदि १३ सोमे सकल भट्टारकश्रीविजयानंन्दसूरिचरणसेवक ।''

**चारित्रवर्धन आणि त्याचा काळ**

चारित्रवर्धन हा कालिदासाच्या तुलनेने प्राचीन आणि महत्त्वाचा असा अप्रकाशित टीकाकार आहे. याने रघुवंश, कुमारसंभव, मेधदूत, शिशुपालवध, रावणपाण्डवीय यावर टीका लिहिल्या आहेत. यापैकी कुमार संभवावरील टीका १८९८ मध्ये प्रसिद्ध झाली (द्विवेदि रेवा प्रसाद, १९९७ पृ. २६) चरित्रवर्धनाची माहिती त्याने लिहिलेल्या टीकेच्या प्रस्तावनेत आणि समाप्ति वाक्यावरून थोडी फार मिळते तेवढीच. त्याची विद्वत्तासूचक बिरुदावली, त्याचा धार्मिक अधिकार आणि विद्यावंश यात नमूद केला आहे. ग्रंथ लिहिण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीचे वर्णनही येथे येते. त्याच्या जैनत्वाचा सूचक उल्लेख त्याच्या प्रस्तावनेत व समाप्तिवाक्यात आढळतो. तो मंगलाचरणात वैदिक आणि हिन्दु देवतांसोबतच जैन गुरूंना अभिवादन करतो. ''प्रत्यूहव्यूहनाशं दिशतु जिनपति: पार्श्वनाथ: स देवो ।'' टीकेच्या शेवटी तो स्वत:ची माहिती देतो; ती अशी 'श्रीमालान्वयसाधु – शालिगनंदन साधुमुख्यारडक्क मल्लसमभ्यर्थितखरतरगच्छीयनरवेशसरस्वतिवाचनाचार्यश्रीचारित्रवर्धन विरचितायां राघवीयकाव्यटीकायां शिशुहितैषिण्यां प्रथम: सर्ग: ।''

शिशुपालवधाची टीकेमध्ये तो सहस्रमल्ल नावाच्या जैन साधूला नमन करतो. तर या टीकेची समाप्ती ''जैन प्रभीय स्वस्थातुच्छगच्छ तिलकायमान चारित्रवर्धनविरचितायां शिशुपालवध महाकाव्य टीकायां'' असा करतो. कुमारसंभवाच्या टीकेची समाप्ती ''श्रीवाचनाचार्य चारित्रवर्धनविरचितायां कुमारतात्पर्यदीपिकायां शिशुहितैषिण्यां कुमारसंभवटीकायां षष्ठ: सर्ग:'' अशी फक्त स्वत:चा उल्लेख करून करतो. तो स्वत:च्या टीकेचे नाव 'शिशुहितैषिणी' असेच देतो. परंतु मेघदूताच्या टीकेला 'विद्याधरी' असे नाव आहे व या टीकेची सुरुवात विष्णु व लक्ष्मीच्या वन्दनाने केलेली आहे. तसेच 'नैषधीयचरित'वरील विद्याधरी किंवा साहित्य विद्याधर ही टीका ही चारित्रवर्धनाची नाही. चारित्रवर्धन आणि विद्याधर एकच आहेत असे डॉ.वुल्हेरचे मत चुकीचे असावे. औफ्रेट ही नैषधीय टीका चारित्रवर्धनाची मानतो. रामचन्द्रभिषक् यांचा मुलगा म्हणजे चारित्रवर्धन आणि साहित्य विद्याधराचा विद्याधर एकच आहेत असे मानतो. १८७४–७५ मध्ये प्रो. हँडिकीने सादर केलेल्या अहवालामध्ये चारित्रवर्धन आणि विद्याधर एक असल्याची माहिती

नाही. परंतु ती माहिती औफ्रेटच्या कॅटलॉगाचा स्वरूपात आढळते. विद्याधराची आणि चारित्रवर्धनाची नैषधीय टीका वेगवेगळी आहे. चारित्रवर्धनाने 'तिलकाख्या' नावानेच नैषधीय टीका लिहिली आहे. ''चारित्रवर्धनेन विरचिता तिलकाख्या ।'' आणि ''विद्याधरेण विरचिता विद्याधरी ।'' चारित्रवर्धनाच्या 'नैषधीय टीकेचा नामनिर्देश औफ्रेटच्या कॅटलॉगमध्ये उपलब्ध आहे. पण्डित शिवदत्त यांच्या मते चारित्रवर्धन आणि विद्याधर हे दोन्ही टीकाकार वेगवेगळ्या व्यक्ती आहेत. त्यांनी एकाच विषयावर दोन वेगळ्या टीका लिहिल्या आहे. चारित्रवर्धनाने 'तिलकाख्या' आणि विद्याधराने 'विद्याधरी'. विद्याधर आणि चारित्रवर्धन दोघे एकच आहेत असे डॉ. बुल्हेर यांनी चुकीचे मत मांडले आहे असे पी. के. गोडे यांचे मत आहे (१९५३, पृ. २५-२२५)

चारित्रवर्धनाच्या कालखंडाबाबत चर्चा करताना प्रो. हॅण्डीकी यांनी बुल्हेरप्रमाणेच चारित्रवर्धन आणि विद्याधर एकच आहेत वेगळे नाहीत असे सांगितले आणि तसे त्यांनी १८७४-७५च्या अहवालात म्हटले आहे. गोडेंच्या मते हे दोन्ही लेखक वेगळे असून त्यांच्यात साधर्म्य आहे. त्यापैकी इ. स. १८५०-६० हा विद्याधराचा कालखंड आणि ११७२-१३८५ हा चारित्रवर्धनाचा कालखंड असावा. चारित्रवर्धन वल्लभानंतरचा आहे कारण तो वल्लभाचा उल्लेख करतो. दिनकराची सुबोधिनी शिशुहितैषिणीचा सारांश आहे असे नंदरगीकरांच्या टिपणावरून स्पष्ट होते. वल्लभ आणि दिनकराच्या मध्ये हेमाद्रि आणि चारित्रवर्धन होऊन गेले असावेत. वल्लभ दहाव्या शतकातील आहे. तो रघुवंशाचा सर्वात प्राचीन टीकाकार आहे. दिनकराचा काळ इ.स. १३८५ आणि हेमाद्रिचा इ.स. १२७१-१३०९ असा आहे. चारित्रवर्धन हेमाद्रिला प्रभावित करतो असे नंदरगीकरांच्या टिपणांवरून स्पष्ट होते म्हणजे चारित्रवर्धन हेमाद्रिच्या आधी असावा. यावरून ११७२-१३८५ हा चारित्रवर्धनाचा कालखंड असावा.

**रघुवंशशिशुहितैषिणीच्या हस्तलिखितांचा परिचय**

चारित्रवर्धनाची रघुवंशशिशुहितैषिणी अद्यापि अप्रकाशित असल्यामुळे प्रस्तुत प्रबंध हा फक्त हस्तलिखितांवरच आधारलेला आहे. रघुवंश शिशुहितैषिणीची चार हस्तलिखिते भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ, पुणे येथे जतन करून ठेवली आहेत. या हस्तलिखितांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

### १) रघुवंशशिशुहितैषणी

$\frac{४५}{१८७३-७४} - १० \frac{३''}{८} \times ४ \frac{१''}{२}$ , २१० पाने आहेत. प्रत्येक पानावर १८ ओळी आहेत. प्रत्येक ओळीत ५४ अक्षरे आहेत. हस्तलिखित जीर्ण झाले आहे. साध्या कागदावर लिहिलेले आहे. पहिले व शेवटचे पान गहाळ झाले आहे. लिपी देवनागरी आहे. अक्षरे लहान, परंतु स्वच्छ आणि वाचायला योग्य आहेत. हे हस्तलिखित काळजीपूर्वक लिहिले असले तरी अनेकदा अनावश्यक मात्रा दिलेल्या आढळतात. उदा. जनायेति ऐवजी जनोयति (३-१६) क्वचित् पृष्ठ मात्रा आणि मात्रा दोन्हीचाही वापर केला आहे. उदा. प्रीतीं ततानातोन (ततान तेन) ''अभक्तिभावानोति तृतीया (१४-४) येथे 'भावेनेति' पृष्ठमात्रा आहे. या हस्तलिखिताची सुरुवात 'खिलप्रत्यूह संघातविधानं' अशी आहे आणि 'इति श्रीमालान्वयसाधुश्रीशालिंगतनुज – साधुश्रीअरडक्कमल्लसमभ्यर्थितखरतरगच्छियनरवेशसरस्वतीवाचनाचार्यश्रीचारित्रवर्धनविरचितायां शिशुहितैषिण्यां राघवीयटीकायां एकोनविंशतितम: सर्ग:' असा शेवट आहे. गुजराथी लिपीचा प्रभाव आहे. अशी सुरुवात

करताना हस्तलिखितात ॐ या अक्षरासाठी अनेक अक्षरे वापरलेली आहेत. उदा. र्दण, र्दण, एर्दणा, एर्द, ए, र्दण्णा, र्दण आणि एर्दण इत्यादी हा जैन नागरीचा प्रभाव असावा. (पी.के. गोडे, १९४२ पृ. २१४) हस्तलिखित वाचताना लिखाणात क ऐवजी ख, कुसुमोत्कचितान् ऐवजी कुसुमोत्खचितान् (८-५७). स ऐवजी श उदा. रसना - रशना (१६-६५), य ऐवजी ज, उदा. अनुयातलील: - अनुजातलील: (१६-१७), यतात्मन: ऐवजी जितात्मन:, ष ऐवजी ख उदा. मयूषै: - मयूखै: (२-३१), सुषेण - सुखेन (६-४५) निषात - निखात (६-३८) क्ष ऐवजी ष उदा. शिष्यया - शिक्षया (३:२६) ऋक्षवत: - ऋष्यवत: (५-४४) र ऐवजी ल, रेखास्थिरं - लेखास्थिरं (१६-८४), रेखाभावात् - लेखाभावात् (१७-३०) असा फरक जाणवतो.

अक्षरांचा क्रम लिहिताना चुकल्यास ओळीवर आकडे टाकून दुरुस्त करतो. उदा. (१४-२) 'कुमुद्वती' या शब्दाऐवजी 'मु२कु१द्वति' असे शिरोरेखेवर आकडे लिहून दुरुस्ती केली आहे. शब्द खोडण्यासाठी त्यावर दोन उभ्या रेघा दिल्या आहेत. उदा. (१३-९८) 'गुहासु स॥कदरासु' दोन रेघा देऊन जास्तीचा 'स' खोडला आहे. (१४-१३) या श्लोकात 'प्रिये तवाधरणा॥स्पर्द्धिषु विद्रुमेषु' जास्तीचा 'णा' उभ्या दोन रेघा देऊन खोडला आहे. तसेच (१४-४३) या श्लोकात 'ए अक्षमालैव' येथेही 'ए॥' खोडला आहे. लिखाणात एखादी ओळ सुटलेली असेल तर काकपादाचे चिन्ह देऊन ते वाक्य त्याच पानावर वरच्या बाजूला किंवा खालच्या बाजूला किंवा समासात दिले आहे. टीकेत काही ठिकाणी पूर्ण श्लोक उद्धृत केला आहे. उदा. (६-६४) ''ऐरावणास्फालन'' साधारणत: हस्तलिखितामध्ये विरामचिन्हे दिसत नाहीत. प्रस्तुत हस्तलिखितही त्याला अपवाद नाही.

### २) रघुवंशटीका शिशुहितैषिणी

$\frac{४८}{१८७३-७४}$ - १० $\frac{१}{४}$'' x ४ $\frac{३}{८}$'' , २२५ पाने आहेत. एका पानावर बारा ओळी आहेत आणि प्रत्येक ओळीत ४२ अक्षरे आहेत. हस्तलिखिताचा कागद फार जीर्ण आहे. त्यामुळे तुटतो. काही ओळी तुटून गेल्या आहेत. लिपी देवनागरी आहे. अक्षर ठळक आणि चांगले आहे. पानांच्या कडा फाटल्या आहेत. चौथ्या सर्गाचे शेवटचे श्लोक आणि पाचव्या सर्गाचे सुरुवातीचे श्लोक धर्ममेरूच्या टीकेतील आहेत. एकोणिसावा सर्ग फारच फाटला आहे. हस्तलिखिताची सुरुवात ''ॐ श्री गुरुभ्यो नम:। प्रत्यूहनाशनं दिशतु जिनपति:'' अशी आहे. या ठिकाणी लिहिलेल्या ॐ वर गुजराथी लिपीचा प्रभाव आहे. या हस्तलिखिताचा शेवट वरील हस्तलिखिताप्रमाणेच....'इति श्रीमालान्वयसाधुश्रीशालिंगतनुज साधुश्रीअरडक्कमल्लसमभ्यर्थितखरतर-गच्छियनरवेशसरस्वतीवाचनाचार्य श्रीचारित्रवर्धनविरचितायां शिशुहितैषिण्यां राघवीयटीकायां एकोनविंशतितम: सर्ग:' असा आहे.

### ३) रघुवंशटीका शिशुहितैषिणी

$\frac{८५ A}{१८८३-८४}$ - १० $\frac{१}{२}$'' x ५ $\frac{५}{८}$'' , ७४ पाने आहेत.

प्रत्येक पानात चौदा ओळी आणि प्रत्येक ओळीत ३८ अक्षरे आहेत. हस्तलिखिताचा कागद फारच जुना आहे. कागदाला कीड लागल्यामुळे तो जीर्ण झाला आहे. काही ठिकाणी जोड द्यावा लागला आहे.

हस्तलिखित हाताळण्यासारखे नाही. परंतु अक्षरे ठळक आणि वाचण्यासारखी आहेत. तसेच टीकेत श्लोक क्रमांक लाल रंगाच्या शाईने दिले आहेत. पहिला सर्ग पूर्ण आहे. नंतर दोन ते नऊ सर्ग गहाळ आहेत. दहावा सर्ग नवव्या श्लोकापासून आहे. नंतर अकरा, बारा, तेरा, चौदा सर्ग पूर्ण आहेत. पंधरावा सर्ग पन्नास श्लोकापर्यंतच आहे आणि पुढचे सोळा ते एकोणीस सर्ग गहाळ आहेत. या हस्तलिखिताची सुरुवात 'ॐ स्वस्ति श्री गणेशाय नम: । श्री गणेश गुरवे नम: । प्रत्यूह नाशनं दिशतु जिनपति: पार्श्वनाथ: स देवो' अशी आहे.

## ४) रघुवंशटीका शिशुहितैषिणी

$\frac{\text{४६ D}}{\text{१८९५-१९०२}}$ – १० x ४ $\frac{१}{२}$'' , १४६ पाने. प्रत्येक पानावर बारा ओळी आणि प्रत्येक ओळीत पस्तीस अक्षरे आहेत. हस्तलिखिताची पाने जीर्ण असून फाटलेली आहेत. लिपी देवनागरी आहे. अक्षर ठळक आणि वाचनीय आहे. हे हस्तलिखित अपूर्ण आहे. या हस्तलिखिताची सुरुवात आणि शेवट दोन्हीही सापडत नाही.

## शिशुहितैषिणी ग्रंथपरिचय

चारित्रवर्धनाने कालिदासाच्या सर्वच साहित्यावर शिशुहितैषिणी नावाच्या टीका लिहिल्या आहेत. जैन साहित्य का इतिहास (चौधरी १९६९) यामध्ये 'शिशुहितैषिणी' असाही उल्लेख येतो. शिशुहितैषिणीचा एक टीका ग्रन्थ म्हणून विचार करताना तिच्या वैशिष्ट्यांचा विचार करावा लागतो. अशी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ही टीका साधी अनेक पर्यायी शब्द असणारी टीका आहे त्यामुळे फार विद्वान नसणारी व्यक्तसुद्धा या टीकेच्या साहाय्याने रघुवंशाचा अभ्यास करू शकते. टीकेची भाषा सोपी आणि समजण्यासारखी आहे. म्हणूनच शिशुहितैषिणी नाव दिले असावे.

२) दुसरे म्हणजे काव्यातील संकल्पना आणि स्पष्टीकरणे सोप्या पद्धतीने आणि स्पष्टपणे मांडलेल्या आहेत. उदा. २-१ 'जाया प्रति गृहित' येथे जाया हे पद का वापरले. 'पत्नी' किंवा 'भार्या' का नाही याचे स्पष्टीकरण येथे असे दिले आहे. 'प्रति ग्राहयित्री सुदक्षिणा आणि प्रतिगृहित्री कामधेनू आहे. ग्रहणेन आनुकुल्यात् भावी कार्यसिद्धी; अतैव अत्र युक्तं जाया पदं' तथा च श्रुति: 'तत् जाया जाया भवति यदस्मात् जायते पुन:'। अशा प्रकारे एखादी संकल्पना समजे पर्यन्त समजाऊन सांगितली आहे.

३) तिसरे म्हणजे ही टीका संवाद साधणारी वाटते. समोर विद्यार्थी बसले आहेत आणि शिक्षक शिकवित आहे अशा प्रकारची मांडणी या टीकाग्रंथाची आहे. कीदृश:? अथ किम्? की दृशौ तौ? अशाप्रकारे प्रश्न विचारून त्याची उत्तरे दिली आहेत. तसेच आधी झालेल्या विवेचनाचा किंवा चर्चेचा संदर्भ देऊन पुढचा मुद्दा सुरू करताना टीकेत 'इति पूर्वेण अन्वय:' असा उल्लेख आहे. '१-३ स्निग्धेति तौ गुरौ उपक्रमे जग्मुत:इति पूर्वेणान्वय: ।''

(४) शिशुहितैषिणीमध्ये जुन्या टिकाकारांचा उल्लेख 'केचित् अन्य:' किंवा 'कश्चित्' असा केला आहे. यात दक्षिणावर्तनाथ, वल्लभ, भोग वितरक किंवा विस्तारकृत आणि कृष्णभट्ट यांचा उल्लेख आहे. शिशुहितैषिणीत वल्लभाचा उल्लेख वारंवार येतो.

(५) शिशहितैषिणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'छायार्थ:' असा उल्लेख या टीकेत आढळतो. जो इतरत्र फारसा दिसत नाही. अर्थाच्या दृष्टीने सारखेपणा असणाऱ्या शब्दांना पर्याय म्हणतात आणि

प्रत्येक शब्दाची अर्थछाया वेगळी असते. उदा. सगळ्यांच्या मनात मद (आनंद) उत्पन्न करणारा 'मदन', सर्वप्राणीमात्रांच्या दर्पाचे दलन करणारा म्हणून कन्दर्प, शरिरविरहित असल्यामुळे अनंग, मनात असल्यामुळे मनसिज, फुलांचे धनुष्य असल्यामुळे पुष्पधन्वा या अर्थांना अर्थछाया किंवा छायार्थ: असे म्हणतात. याचा वापर शिशुहितैषिणीत वारंवार झाला आहे. उदा. ९-३० 'अभिनयान्परिचेतुमिवोद्यता' ९-५४ 'नर्तक्योऽपि दृश्योभवन्तिते छायार्थ:' 'अपरापि सुन्दरी हस्ताद्दभिनयान्प्रकटयन्ती चित्तान्युन्मादयन्तीति छायार्थ:'।

६) 'शिशुहितैषिणीचे आणखी एक वेगळे आणि उल्लेखनिय वैशिष्ट्य म्हणजे सर्गात ज्या ज्या ठिकाणी अलंकार किंवा वृत्त बदलले आहे त्या त्या वेळी तसा उल्लेख केला आहे तसेच सर्गाच्या शेवटीही वृत्तांचा किंवा अलंकारांचा उल्लेख केला आहे. नवव्या सर्गात सर्वात जास्त वृत्त आणि अलंकाचा उल्लेख आढळतो.

**पूर्वीच्या संशोधनाचा आढावा**

चारित्रवर्धन हा महत्त्वाचा टीकाकार असूनही त्यावर तेवढे संशोधन झाले नाही. संस्कृतवाङ्मयाचा इतिहास सांगणाऱ्या काही पुस्तकांमध्ये त्याचा फक्त नामोल्लेख आढळतो. नंदरगीरांनी त्यांच्या रघुवंशाच्या प्रस्तावनेत रघुवंशाच्या महत्त्वाच्या टीकाकारांचा ऊहापोह केला आहे. त्यात चारित्रवर्धनाच्या हस्तलिखिताचे वर्णन आणि त्याच्या टीकेची वैशिष्ट्ये यांचे वर्णन संक्षिप्तपणे केलेले अढळते. जैन साहित्यातही चारित्रवर्धनाचा नामोल्लेखच येतो. डॉ. निर्मला कुलकर्णी यांचे चारित्रवर्धनावर संशोधनपर दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत. १) 'कालिदासाचा जैन टीकाकार चारित्रवर्धन' (२००३) २) Charitravardhana on Varient Readings या व्यतिरिक्त चारित्रवर्धनावर संशोधन झालेले नाही.

**प्रस्तुत प्रबंधाचे प्रयोजन आणि मर्यादा**

अभ्यासनीय परंतु अप्रकाशित असलेली रघुवंशाची एक चांगली टीका प्रकाशात आणणे हा या प्रबंधाचा मुख्य उद्देश आहे. कारण हस्तलिखित जीर्ण अवस्थेत आहे. हाताळणे अतिशय जोखमीचे आहे; अशा परिस्थितीत एक चांगली टीका नष्ट होऊ नये ती प्रकाशात यावी हाच या मागचा हेतू. हा प्रबंध फक्त एकाच हस्तलिखितावर आधारलेला आहे. चिकित्सक आवृत्ती या ठिकाणी दिलेली नाही. चारित्रवर्धन टीकेत बऱ्याचदा व्याकरणाचे विवेचन देतो; त्यातील समजलेला भाग बिनचूक प्रकाशित केला आहे. जो भाग समजलेला नाही तो तसाच राहू दिला आहे. हस्तलिखिते जीर्ण असल्यामुळे तौलनिक अध्ययन करताना मर्यादा पडते.

**संशोधनपद्धती**

हस्तलिखिताचा अभ्यास करताना साधारणत: जी संशोधन पद्धती वापरली जाते तीच येथे वापरली आहे. प्रथम संपूर्ण हस्तलिखित वाचून लिहून काढले. मी लिहिलेला पाठ सुमारे तीन वेळा मूळ हस्तलिखितांशी ताडून पाहिला व त्यानंतर संपादित पाठ तयार करायला घेतला. अभ्यास करताना जिथे जिथे अभ्यासासाठी घेतलेल्या $\frac{४५}{१८७३-७४}$ हस्तलिखितातील पाठ सदोष वाटला तेथे तेथे दुसऱ्या हस्तलिखिताची $\frac{४८}{१८७३-७४}$ मदत घेतली. नंदरगीकरांच्या रघुवंशाच्या आवृत्तीत (१९९२) बऱ्याच वेळेला टीपांमध्ये चारित्रवर्धनाचा उल्लेख येतो. त्याचाही आधार अनाकलनीय पाठ समजून घेण्यासाठी केला आहे. काही वेळा दोन्ही टीकांमध्ये योग्य संदर्भ लागत नाही. अशा वेळी दोन्ही टीकांच्या आधारे पाठ संपादित केला आहे. (१५-२९) 'स्वर्गाभिष्यन्वमनं..... विनिवेशिता हा भाग पुनरुक्त आहे, म्हणून काढून टाकला

आहे. (१५-४०) स इति....... सन् पर्यंतचा भाग गाळला आहे, म्हणून दुसऱ्या हस्तलिखितातून घेतला आहे. काही ठिकाणी उद्धरणांचा विशेषत: अमरकोशाचा पाठ मूळ पाठापेक्षा वेगळा आढळतो. (२-२८) या वरील टीकेत 'किरण: प्रग्रह: रश्मि:' असा पाठ आहे, परंतु अमरकोशात ''रश्मौ प्रग्राह: प्रग्रहेऽपि च' (अमर ) असा पाठ आहे. असे पाठभेद त्या त्या वेळी टीकेत नमूद केले आहेत. चारित्रवर्धन अनेक ग्रंथामधून विशेषत: कोशांमधून वाक्ये उद्धृत करतो. त्यातील बहुतांश संदर्भ शोधण्याचा या प्रबंधात प्रयत्न केला आहे. चारित्रवर्धनासमोर असलेला रघुवंशाचा पाठ हा वेगळा आहे. त्याचा ऊहापोह येथे केला आहे. (पहा प्रकरण ३) हस्तलिखितात प्रत्येक श्लोकाचे प्रतीक दिलेच आहे असे नाही. परंतु सारखेपणा येण्यासाठी प्रत्येक श्लोकाचा पहिला शब्द टीकेत प्रतीक म्हणून घेतला आहे. श्लोकांचा क्रम जो हस्तलिखितात आहे तोच प्रबंधात स्वीकारला आहे. हा क्रम मल्लिनाथाच्या प्रचलित आवृत्तीतील क्रमापेक्षा भिन्न आहे.